JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# समाज परिवर्तनात शिक्षकाची भूमिका

**Dr. Vaishali Jagannath Ragde (Jadhao)**
**Principal**
Late Narmadabai Bodkhe Adhyapak Mahavidyalaya, Telhara
Dist. Akola. (Maharashtra) India

शिक्षणाद्वारे समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षणाची ध्येय आणि उद्दिष्टे कशी असावीत, अभ्यासक्रम व अध्यापन पध्दती कशी असावी, परिवर्तनाला अनुरुप असा अभ्यासक्रम तयार करणे व सुयोग्य अध्यापन पध्दती वापरणे हे तर आवश्यक आहेच. पण शिक्षण हे परिवर्तनाचे खरेखुरे साधन बनण्यासाठी मुख्य जबाबदारी येऊन पडते ती शिक्षकावरच. शिक्षकच सामाजिक परिवर्तनाचा खराखुरा आधार आहे. समाज बदलण्याचे सामर्थ्य शिक्षकातच आहे.

आतापर्यंतचा इतिहास हेच सांगतो की शिक्षक हाच समाजाचे व देशाचे भवितव्य उज्वल करण्यासाठी विश्वासपात्र असा घटक आहे. तो सामाजिक अभियंता आहे. समाजातील प्रश्नांचे स्वरुप, शिक्षकाइतके इतर कुणालाही माहित नसते. खऱ्या अर्थाने तो समाजसेवक, ग्रामनायक व समाजसुधारक असतो. नवे विचार, नवे ज्ञान, नवे आदर्श व नवी जीवनमूल्ये समाजापर्यत पोहचविण्याचे कार्य शिक्षकच करतो.

प्राचीन काळापासून भारतीय समाजात शिक्षकाला आदराचे स्थान प्राप्त झालेले आहे. "आचार्य देवो भव" अशी आचार्यांविषयी समाजाची श्रध्दा होती. गुरुला परमेश्वराइतके महत्व प्राचीन काळी होते. राजे, महाराजे देखील गुरुआज्ञा प्रमाण मानून त्या आज्ञेचे निष्ठेने पालन करीत असत. आजचा आमचा शिक्षक स्वत:चे सामर्थ्य हरवून बसला आहे, असे खेदाने म्हणावे लागते. सामाजिक परिवर्तनाची शक्ती, समाजाला दिशा देण्याचे सामर्थ्य आजच्या शिक्षकांमध्ये आहे काय ? याचे शिक्षकांनी आत्मपरीक्षण करावे. शिक्षकी पेशा म्हणजे चार भिंतीच्या आत विद्यार्थ्यांना चार धडे शिकविणे, ठरावीक अभ्यासक्रम पूर्ण करणे व परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना पास करणे, एवढे मर्यादित कार्य शिक्षकाचे नाही. शिक्षकी पेशा हा धंदा नसून ते "सतीचे वाण" आहे. अध्यापन कार्य तर त्याचे निहित कर्तव्यच आहे. पण अध्यापन कार्याबरोबरच सामाजिक नियंत्रण व समाज परिवर्तन ही कार्येसुध्दा शिक्षकाचीच आहेत. शाळेची इमारत, फर्निचर, क्रीडांगण या सर्व निर्जीव बाबी आहेत. शिक्षक हा एक सचेतन मानवी घटक आहे. एक संवेदनशील, विचारी, समाजशील व सामाजिक जबाबदारीची जाणीव असणारा, चारित्र्यसंपन्न माणूस म्हणून सामाजिक नियंत्रणात व परिवर्तनात शिक्षकाची जबाबदारी फार मोठी आहे. पण आमचा आजचा शिक्षक स्थितिशील परंपरावादी व प्रवाह पतित बनला आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत तो उदासीन आहे. परिवर्तनाला फारसा उत्सुक नाही. नव्या ज्ञानाबद्दल, नव्या संशोधनाबद्दल व नव्या जीवनप्रणालीबाबत तो फारसा जागरुक नाही. जगात ज्ञानाचा प्रचंड विस्फोट होत आहे. पण आमचा शिक्षक मात्र जुन्या चाकोरीबाहेर जाण्यास तयार नाही. नव्याने स्वागत करण्याची त्याची मानसिक तयारी दिसत नाही.

आपल्या अध्यापन व्यवसायावर पूर्ण निष्ठा नाही. शिक्षणाविषयी व शिक्षणाच्या कार्याविषयी त्याला विश्वास वाटत नाही. अर्थात, समाजातील परिस्थिती त्याला कारणीभूत आहे, याचाही आपण विचार केला पाहिजे. समाज शिक्षकाला मान, सन्मान देत नाही, हे खरे आहे. त्याच बरोबर समाजात आज शिक्षणाचा बाजार मांडला जात आहे. विना अनुदान तत्वावर चालविली जाणारी महाविद्यालये अध्यापक महाविद्यालये यांनी तर शिक्षण आणि शिक्षक या दोघांचेही अवमूल्यन केले आहे. शिक्षणासाठी आकारली जाणारी जबरदस्त फी, शिक्षकांना दिले जाणारे अल्पवेतन व शिक्षकाला नोकरी मिळविण्यासाठी द्यावी लागणारी "लाच" या सर्वांचा विचार करता शिक्षकांना समाजाबद्दल आपुलकी, प्रेम व जिव्हाळा कसा वाटणार ? सामाजिक जबाबदारीची जाणीव त्याच्या ठिकाणी कशी निर्माण होणार ? राजकीय सत्ताधिकाऱ्यांचा शिक्षणातील हस्तक्षेप शिक्षकाला फारच जाचक झाला आहे. अशा परिस्थितीत त्याच्याकडून समाज परिवर्तनाच्या कार्याची अपेक्षा बाळगणे कितपत योग्य आहे ?

शिक्षकाच्या वरील अडचणी मान्य करुनही त्याच्या भूमिकेबाबत दुर्लक्ष करता येणार नाही. समाजातील त्याचे स्थानच असे आहे की, निरपेक्ष बुध्दीने, कोणत्याही मान-सन्मानाच्या अपेक्षेने त्याने समाजसेवेचे कार्य करावयाचे नाही. आपल्या कार्याने समाजाचे लक्ष त्याने आपणाकडे वेधून घ्यावयाचे आहे. आजही त्यागी, सेवाभावी व चारित्र्यसंपन्न शिक्षकांची वानवा नाही. शासन आणि समाज अशा शिक्षकांच्या कार्याची जरुर दखल घेत असते.

प्रा. हुमायुन कबीर या विषयी म्हणतात, "चांगल्या शिक्षकांविना उत्कृष्ट शिक्षण पध्दतीसुध्दा अपयशी ठरते व चांगल्या शिक्षकांमुळे शिक्षण पध्दतीतील दोषही दूर करता येतात."

"Without good teachers even the best of system is bound to fail with good teachers, even the defects of a system can be largely overcome." – Humayun Kabir.

पुढे ते म्हणतात, "समाजाचे भवितव्य त्या समाजातील शिक्षकांच्या दर्जावर अवलंबून असते. असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही की, अपात्र आणि असमाधानी शिक्षकामुळे समाजाची बैठक निष्कृष्ट दर्जाची होते."

"Fate of society depends on the quality of its teachers. It is no exaggeration to say that incompetent and dissatisfied teachers undermine the very foundation of society."

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात, "समाजातील शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. पारंपारिक ज्ञानाचे आणि तांत्रिक कौशल्यांचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे करण्याच्या प्रक्रियेतील तो मुख्य आधार आहे.तोच संस्कृतीचा नंदादीप प्रज्वलित ठेवतो. तो फक्त विद्यार्थ्याला मार्गदर्शन करतो असे नाही तर तो राष्ट्राचे भवितव्य घडवतो." समाजातील आपली जबाबदारी शिक्षकांनी ओळखली पाहिजे.

The teacher's place in society is of vital importance. He acts as the pivot for transmission of intellectual traditions and technical skills from generation to generation and helps to keep the lamp of civilization burning. He not only guides the individual, but also to shape the destiny of nation – Dr. S. Radhakrishnan.

समाजातील शिक्षकाच्या स्थानाबाबत मान्यवरांची मते आपण अभ्यासली आहेत. शिक्षणाव्दारे समाज परिवर्तना घडवून आणावयाचे असले तर शिक्षकाने स्वत: बदलले पाहिजे. समाजाच्या समस्या, समाजाचे तत्वज्ञान, समाज जीवनाची ध्येये आणि उद्दिष्टे त्याने समजावून घेतली पाहिजेत. शिक्षणाच्या माध्यमातून जो नवा समाज घडवायचा आहे त्याचे स्वरुप शिक्षकाने समोर ठेवले पाहिजे. समाज परिवर्तनासाठी शिक्षक आधुनिक बनला पाहिजे.

आधुनिक म्हणजे प्रयोगशील, पुरोगामी व नव्याचा स्वीकार आणि स्वागत करणारा असला पाहिजे. सामाजिक परिवर्तनाला आवश्यक अशी मनोभूमिका तयार करण्याच्या कामी शिक्षक प्रयत्नशील असले पाहिजेत. समाजातील नवे आदर्श, बदलणारी उपयुक्त जीवनमूल्ये स्वीकारण्याची त्याने विद्यार्थ्यांची तयारी करुन घेतली पाहिजे. त्यासाठी त्याने स्वत: बदलले पाहिजे.

असे म्हणतात की, कोणत्याही देशातील शिक्षणपध्दती ती राबविणाऱ्या शिक्षकापेक्षा अधिक प्रगत असू शकत नाही. समाज परिवर्तनाचा तोच खरा आधारस्तंभ आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**


1) शिक्षणाचे तत्वज्ञान व समाजशास्त्र, देशमुख (1998), प्रा. एल. जी, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

2) शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र (1987), पारसनीस डॉ. न. रा, नुतन प्रकाशन, पुणे.

3) भारतातील आजच्या सामाजिक समस्या, (1992), कोंडेकर प्रा. ए. वाय, फडके प्रकाशन.

4) शिक्षणाचे तत्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान (2007), देशमुख प्रा. एल. जी, फडके प्रकाशन कोल्हापूर.


JETIR